# G S Science, Arts and Commerce College, Khamgaon

| | |
|---|---|
| Title of the Activity | Guest Lecture on **occasion of National Science Day 2023** |
| Organizing Department | Department of Physics and Innovation, Incubation and Entrepreneurship Cell |
| Date | February 28, 2023 |
| Venue | G. S. Science, Arts and Commerce College, Khamgaon |
| Guest/ Resource Persons | Hon. Dr. Chetansingh Rajput,<br>Assistant Commissioner,<br>GST, Khamgaon<br><br>Chief Guest: Hon. Mr. Rathod<br>Deputy Commissioner of State Tax at Khamgaon<br><br>Hon. Shri. Ashikji Jhunjhunwala<br>Vice-president, VSPM Khamgaon<br><br>Chairman: Dr. D. S. Talwankar<br>Principal, G. S. College, Khamgaon. |
| No of Beneficiaries | Students 171 Teachers 12 Other 4 |
| Brief Report about event | On the Occasion of National Science Day 2023, Department of Physics and Innovation, Incubation and Entrepreneurship Cell organized Guest lecture of Hon. Dr. Chetansingh Rajput, Assistant Commissioner, GST Khamgaon.<br>The program was presided over by the principal of the college, Dr. Dhananjay Talwankar. Dr. S. P. Hargunani deliver introductory speech. In the introduction, he gave information about the theme of this year's Science Day and explained its importance. The said program was attended by Deputy Commissioner of State Tax at Khamgaon Mr. Rathod Sir, Adv. Savji Sir and Vice President of Vidarbha Education Broadcasting Board Hon. Shri Ashokji Jhunnjhunnwala was the chief presence. Hon. Dr. Chetan Singh Rajput in a very simple and straightforward language gave information about the research in physics, chemistry and mathematics with real life examples and shared his experiences with the students in a very interesting way. Dr. Rajput sir explained with examples how important the scientific approach is in education, thus informing the students how to adopt a doctor's attitude and a researcher's attitude towards science while studying. Dr. Dhananjay Talvankar sir in his presidential speech expressed the belief that this will definitely be useful for the students for their bright future and a living example of how any student can achieve his goals through obstacles.<br><br>On this occasion the coordinator of Innovation and Incubation Cell Prof. RM, Dr SP Hargunane, Prof. Sapna Rajankar, Dr. Nandkishore Mahale, |

| | |
|---|---|
| | Member of Innovative Incubation and Entrepreneurship Cell Prof. Dr. G B Kale, Dr. DN Vyas, Dr. Deepak Nagar, Prof. Ishwar Karale was present. Vice Principal of the college Dr. PV Ubale, Dr. PV Padghan, Dr. MO Wankhede, Dr. PP Thakur, Prof. Sachin Shingane was present and boosted the enthusiasm of the students. The program was coordinated very well by the student Ms. Sakshi Nemane and Ms. Pooja Thakhare. Mansi Satav expressed the vote of thanks. |







Hon. Dr. Chetansingh Rajput delivering guest lecture.




Principal Dr. D. S. Talwankar delivering presidential speech




Honorable guests felicitating the students

विदर्भ दर्पण — संमिश्र वृत्त — शुक्रवार, दि. ३ मार्च २०२३ — ६

# राष्ट्रीय विज्ञान दिनी गो. से. महाविद्यालयात व्याख्यान व प्रदर्शनी



खामगाव (प्रतिनिधी) : विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित गो. से. महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग व इनोवेशन, इंक्युबेशन व इंटरप्रिनरशिप विभागा द्वारे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले डॉ. चेतन सिंग राजपूत सहाय्यक राज्यकर उपायुक्त, खामगाव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले तसेच इनोव्हेटिव प्रोजेक्टची प्रदर्शनी भरवण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धनंजय तळवणकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक भौतिकशास्त्र विभागाचे डॉ.एस.पी. हरसुलांनी यांनी केले. प्रास्ताविकेमध्ये त्यांनी यावर्षीच्या विज्ञान दिनाच्या थीम बद्दल माहिती दिली व त्याचे महत्व विशद केले. सदर कार्यक्रमाला खामगाव येथील राज्य कर उपायुक्त श्री राठोड, ॲड. सावजी व विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अशोक झुनझुनवाला यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शक डॉ चेतन सिंग राजपूत यांचा उद्देश प्राचार्य डॉ. तळवणकर यांनी केला व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. यानंतर इनोव्हेटिव प्रोजेक्ट एक्जीबिशन चे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते भौतिकशास्त्र विभागाच्या करण्यात आले. इनोव्हेटिव प्रोजेक्ट एक्जीबिशन मध्ये प्रथम क्रमांक क्रायोनिक्स या प्रोजेक्टसाठी ज्ञानेश्वर माम्मगोल, कृतिका नोखले, निकिता छत्तड व संकेत गावंडे एम. एस. सी. वनस्पतीशास्त्र या विद्यार्थ्यांना मिळाला. द्वितीय क्रमांक बायोगॅस प्रोडक्शन फ्रॉम मिथ्यानोजेनिक बॅक्टेरिया या प्रोजेक्टसाठी राधिका भागवत, प्रेरणा येडे, ओम अहेल बीएससी भाग २ च्या विद्यार्थ्यांना पटकविला तर तृतीय क्रमांक सेल्फ मेडिकेशन सेल्फ हार्म या प्रोजेक्टसाठी रिया अग्रवाल बीएससी भाग दोन या विद्यार्थिनीला मिळाला. इनोव्हेटिव प्रोजेक्ट एक्जीबिशन चे परीक्षण डॉ. जी. बी. काळे व प्रा. एन. बी. कुटेमाटे यांनी केले. यावेळी इनोवेशन व इन्क्युबेशन सेलचे समन्वयक प्रा.आर.एम., डॉ.एस.पी. हरसुलांनी, प्रा.सपना राजनकर, डॉ.नंदकिशोर महाले, इनोव्हेटिव्ह इन्क्युबेशन ॲंड इंटरप्रिनरशीप सेलचे सदस्य प्रा.डॉ.जी.बी.काळे, डॉ. डी.एन.व्यास, डॉ.दीपक नागरिक, प्रा.ईश्वर कराळे हे उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.पी.व्ही.उबाळे, डॉ.पी.व्ही.पडघन, डॉ.एम.ओ.वानखेडे, डॉ.पी.पी.ठाकूर, प्रा.सचिन शिंगणे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय सुरेखपणे विद्यार्थिनी कु.साक्षी नेमाने व कु. पूजा ठाकरे यांनी केले तर आभार कु.मान्सी सातव यांनी व्यक्त केले अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा.डॉ.राजिव देशमुख यांनी कळविले आहे.

# कायदेविषयक मार्गदर्शन शिबीर अंतर्गत विविध विषयांवर पथनाट्याचे सादरीकरण

## विद्यापीठातील विधी विभागाचे परतवाडा येथे आयोजन

अमरावती (वि.प्रति.) : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर विधी विभागातर्फे शिक्षण संशोधन व विस्तार विभाग उपक्रमांतर्गत परतवाडा येथील राजा शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आणि कै. यादवरावदादा देशमुख विधी महाविद्यालय येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य राजेश श्रीवास होते. विधी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली, डॉ. सी. के.व्ही. जावळे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांनी भ्रूणहत्या, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार, बालमजुरी, दारू प्रतिबंधक कायदा, अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याची पथनाट्यद्वारे जनजागृती केली.

चिखलदरा येथील आदिवासी मुलामुलींच्या शासकीय वसतिगृह येथे आदिवासी विद्यार्थ्यांना पथनाट्याच्या माध्यमातून कायद्याविषयी माहिती दिली. कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश जयपुरकर तसेच गृहपाल श्री. गिरीश केवटे, कु. प्रतिक्षा साबळे, ममता वानखडे यांचे या कार्यक्रमाला सहकार्य मिळाले. कार्यक्रमासाठी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विभागप्रमुख डॉ. विजयकुमार चौबे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता विधी विभागातील डॉ. योगिता हुलके, प्रा. हर्षाली मुळ्ये, प्रा. राजकुमार कटकतलवारे, श्री. मुरलीधर खोपडे यांनी परिश्रम घेतले.

सोमवार ६ मार्च २०२३ प्रश्नकाल पान नं. २

## राष्ट्रीय विज्ञान दिनी गो. से. महाविद्यालयात व्याख्यान व प्रदर्शनी




**खामगाव–** विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचालित गो. से. महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभाग व इनोवेशन, इंक्युबेशन व इंटरप्रिनर्शिप विभागाद्वारे अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेले डॉ. चेतन सिंग राजपूत सहाय्यक राज्यकर उपायुक्त, खामगाव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. तसेच इनोव्हेटिव प्रोजेक्टची प्रदर्शनी भरवण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ धनंजय तळवणकर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे आयोजक भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. एस. पी. हरगुणांनी सरांनी केले. सदर कार्यक्रमाला खामगाव येथील राज्यकर उपायुक्त राठोड, अॅड. सावजी सर व विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष अशोक झुंनझुंनवाला यांची प्रमुख उपस्थिती होती. मार्गदर्शक डॉ. चेतनसिंग राजपूत यांनी अगदी सोप्या व सरळ भाषेमध्ये अनुभवाधिस्तीत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या विषयांमधील संशोधनाची माहिती दिली व अतिशय रंजकपणे आपले अनुभव विद्यार्थ्यांसोबत समोर सांगितले. डॉ राजपूत सरांनी वैज्ञानिक दृष्टिकोन हा शिक्षण घेताना किती महत्त्वाचा आहे याचे उदाहरणासहित स्पष्टीकरण दिले यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण घेतानाच विज्ञानाबद्दल चिकित्सक वृत्ती व संशोधक वृत्ती कशी अंगीकृत करावी याची माहिती दिली. यानंतर इनोव्हेटिव प्रोजेक्ट एक्जीबिशनचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते भौतिकशास्त्र विभागाचे करण्यात आले. इनोव्हेटिव प्रोजेक्ट एक्जीबिशनमध्ये प्रथम क्रमांक अॅक्वापोनिक्स या प्रोजेक्टसाठी ज्ञानेश्वर गायगोल, कृतिका गोखले, निकिता छाजड व संकेत गावंडे एमएससी. वनस्पतीशास्त्र या विद्यार्थ्यांना मिळाला. द्वितीय क्रमांक बायोगॅस प्रोडक्शन फ्रॉम मिथ्यानोजेनिक बॅक्टेरिया या प्रोजेक्टसाठी राधिका भागवत, प्रेरणा बेंडे, ओम अडेल बीएससी भाग २ च्या विद्यार्थ्यांनी पटकविला तर तृतीय क्रमांक सेल्फ मेडिकेशन सेल्फ हार्म या प्रोजेक्टसाठी रिया अग्रवाल बीएससी भाग दोन या विद्यार्थिनीला मिळाला. इनोव्हेटिव प्रोजेक्ट एक्जीबिशनचे परीक्षण डॉ. जी. बी. काळे व प्रा. एन. बी. कुटेमाटे यांनी केले.

## इनरव्हिल क्लब ऑफ खामगाव यांच्यातर्फे विवाह सोहळा संपन्न



**खामगाव** - लग्न एक स्वप्नांकित ऋणानुबंध' अश्याच एका अनाथ मुलीच्या विवाहाची जबाबदारी इनरव्हिल क्लब ऑफ खामगाव यांनी पार पाडली. विवाह बंधनाची ही रेशीमगाठ चि. सौ. का. हर्षा व चि. रिकीन यांच्यात जुळून आली.

हा शुभमंगल सोहळा २२ फेब्रुवारी रोजी सुर्योदय बालगृह, स्व. चिमनलाल भरतीया स्मृती भवन, महर्षी वाल्मिकी नर्सिंग कॉलेज जवळ, बसेरा कॉलनी, मलकापुर, येथे इनरव्हिल क्लब ऑफ खामगाव यांच्यातर्फे संपन्न झाला.

या प्रसंगी इनरव्हिल क्लब ऑफ खामगाव यांच्याकडून नव दांम्पत्यास संसार उपयोगी वस्तू व शुभेच्छा देण्यात आल्या.

नवदाम्पत्यांनी इनरव्हिल क्लब ऑफ खामगावच्या उपस्थीत सदस्यांचे आभार मानले.या कार्यक्रमात अध्यक्षा सौ. स्नेहा चौधरी, सारिका नवघरे इनरव्हिल क्लब ऑफ खामगाव सदस्यांची उपस्थीती होती.

Activity In charge

Principal